वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट

अंक 48 वा

दिनांक-28/11/2022 ते दिनांक-02/12/2022

पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम.

जावक क्रमांक :- दिनांक:-

( केवळ कार्यालयीन कामकाजासाठी )

17124
16 DEC 2022

---

**भाग-01:-**

**बदली :- निरंक**

**पदोन्नती :- निरंक**

**नेमणुक :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/ आशा-4/पोशि/क.म/भिसे+1/ हजर/13973/2022, वाशिम दि.01/12/2022 अन्वये खालील नमुद कर्मशाळा मदतनीस (पोशि) हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या घटकातुन पोलीस अधिक्षक,वाशिम यांचे आस्थापनेवर बिनतारी संदेश विभाग, वाशिम येथे सर्वसाधारण बदल्या-2022 मध्ये प्रशासकीय बदली झाल्याने बदलीवर हजर होणे कामी आले असता त्यानां दि.11/11/2022 रोजी मा.पुर्वी कर्तव्यावर हजर करुन घेण्यात आलें आहे.

| अ.क्र | अंमलदार यांचे नाव/पदनाम | पुर्वीचे नेमणुकीचे ठिकाण | बदलीवर नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 1. | श्री.प्रविण विकास भिसे , कर्मशाळा मदतनीस (पोशि) | पोलीस अधिक्षक,जळगाव | पोलीस अधिक्षक वाशिम |
| 2. | श्री.संतोष प्रकाश शेवाळे,कर्मशाळा मदतनीस (पोशि) | पोलीस अधिक्षक ,कोल्हापुर | पोलीस अधिक्षक वाशिम |

**भाग-2 :-**

**रजा :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आलि-03/अर्जित रजा /पो.अंमलदार/13885/2022 वाशिम दिनांक 28/11/2022 अन्वये पोशि/757,अभिषेक नंदकिशोर नवघरे नेम.पो.मु.वाशिम यांनी विभागीय पोउपनि पदाची मैदानी चाचणी करीता दिनांक 25/11/2022 ते 09/12/2022 पावेतो 15 दिवस अर्जित रजा मंजुरीबाबत विनंती केलीस असल्याने त्यांची दिनांक 25/11/2022 ते दि.09/11/2022 पावेतो 15 दिवस अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/विचौ/सिक गैरहजर/पोशि/58/एकनाथ नासणे/13892/2022 वाशिम दिनांक 28/11/2022 अन्वये पोशि/58,एकनाथ नामदेव नासणे नेम.पो.मु.वाशिम हे दिनांक 01/11/2021 ते दि.06/09/2022 पावेतो 310 दिवस सिक/गैरहजर होते .सदर पोलीस अंमलदार यांना दिनांक 24/11/2022 रोजी मा.पो.अ.यांचे आज्ञांकित कक्षात बोलविले असता त्यांचे म्हणने संयुक्तीक वाटुन आल्याने त्यांचा दिनांक 01/11/2021 ते 06/09/2022 पावेतो 310 दिवस गैरहजर कालावधी खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.1.दि.01/11/2021 ते दि.04/01/2022 - 65 दिवस परावर्तीत रजा.02) दि.05/01/2022 ते दि.06/09/2022 पावेतो 245 दिवस अर्जित रजा.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक:-पोअवा/आलि-3/सिक-रजा/पोलीस कर्मचारी/13895/2022, वाशिम दि.29/11/2022 अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांचे सिक कालावधीचे कारणास्तव त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे परावर्तीत रजा/ अर्जित रजा' मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | ब.न. | कर्मचाऱ्याचे नांव | नेमणुक | सिक कालावधी | मंजुर रजा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पोना | 842 | मुकेश भगत | स्थागुशा | दि.01/09/2022 ते दि.07/09/2022 पावेतो 07 दिवस | परावर्तीत रजा |
| 2 | पोशि | 849 | निलेश प्रल्हादराव इंगळे | स्थागुशा | दि.09/07/2022 ते दि.18/07/2022 पावेतो 10 दिवस | परावर्तीत रजा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | पोना | 1042 | किशोर रुपसिंग पवार | जिवाशा | दि.20/06/2022 ते दि.11/07/2022 पावेतो 22 दिवस | परावर्तीत रजा |
| 4 | मपोशि | 1286 | वैशाली कृष्णाजी इंगोले | मोपवि | दि.19/09/2022 ते दि.11/10/2022 पावेतो 23 दिवस | परावर्तीत रजा |
| 5 | पोशि | 1117 | रवि विजय मालवे | आसेगाव | दि.05/10/2022 ते दि.18/10/2022 पावेतो 14 दिवस | 10 दिवस परावर्तीत व 04 दिवस अर्जित रजा |
| 6 | सपोउपनि | बियंचा | एस.एस.गांधी | बि.सं.विभाग | दि.03/10/2022 ते दि.17/10/2022 पावेतो 15 दिवस | परावर्तीत रजा |
| 7 | पोना | 1141 | गजानन लोखंडे | कांरजा ग्रामीण | दि.02/09/2022 ते दि.21/09/2022 पावेतो 20 दिवस | परावर्तीत रजा |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आलि-03/रजा प्रवास सवलत/गट वर्ष2021-24/13967/2022, वाशिम दि.01/12/2022खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांचे विनंतीनुसार सन 2021-24 या गट वर्षाकरीता महाराष्ट्र दर्शन (रजा प्रवास सवलत) महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र. रप्रस/1994/184/सेवा-5, दि. 28/03/1995 व महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: रप्रस-1114/प्र.क्र.11/सेवा-5, दिनांक 10/06/2015 अन्वये त्यांचा कुटुंबियांसह त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी जाणे-येण्या करीता रजाप्रवास सवलत मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांचे नाव, पदनाम , ब.नं. | कुटुंबातील इतर सदस्यांची नावे | वय | नाते | प्रवासाचे ठिकाण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पासुन | पर्यंत |
| 1 | मपोशि/971, पुजा देविदास मनवर | वंदना देविदास मनवर<br>देविदास विठ्ठल मनवर | 51 वर्षे<br>54 वर्षे | आई<br>वडिल | वाशिम | वेंगुर्ला |

रजा प्रवास सवलत उपभोगण्याकरीता कोणत्याही प्रकारची विशेष रजा देय नाही. रजा प्रवास सवलत उपभोगण्याकरीता किरकोळ किंवा अर्जित रजा मंजुर करुनच जाता येईल. तसेच सदरची सवलत ही दि. 31 डिसें. पर्यंत उपभोगणे आवश्यक राहील. त्यानंतर व्यपगत होउन अनुज्ञेय ठरणार नाही, यांची नोंद घ्यावी.

या कार्यालयाचे आदेश क्र पोअवा/आलि-2/निवृत्तपुर्व रजा/पोलीस अ./14014/2022,दि 02/12/2022 अन्वये खालील पोलीस अंमलदार यांनी या कार्यालयास सेवानिवृत्त पुर्व रजा मंजुर होणेबाबत या कार्यालयास विनंती अर्ज सादर केला आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदारांचे नाव | नेमणुक | सेवानिवृत्ती दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | सपोउपनि/547,जयवंत नरसिंह पवार | वाशिम शहर | 30/06/2023 |

त्या अनुषंगाने वर नमुद पोलीस अंमलदार यांना कळविण्यात यावे की, मा.पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांचे ज्ञाप क्रमांक पोमस/3-अ/सेनिपु.रजा-देसाई/24/2017 दिनांक 18/05/2017 अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981, नियक क्र.66 (1) मध्ये नमुद केलेल्या सेवानिवृत्तीपुर्वी रजा मंजुरीबाबतचा नियम आता अस्तितवात नाही.पोलीस अधिकारी/कर्मचा-यांच्या खात्यात शिल्लक असलेली अर्जित रजा/अर्धवेतनीय रजा ते सेवानिवृत्तीपुर्वी उपभोगु शकतात, मात्र अर्धवेतनीय रजा घेतांना वैद्यकीय प्रमाणपत्र आवश्यक राहील असे निर्देश देण्यात आले आहेत.तशी समज नमुद पोलीस अंमलदार यानां देवुन तसा अहवाल उलट टपाली या कार्यालयास न चुकता सादर करावा.

**परवानगी :- निरंक**

**भाग -3**

**बढती :- निरंक**

**पगार :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आलि-2/पोहवा-वेतन निश्चिती/13982/2022 वाशिम दिनांक 01/12/2022 अन्वये खालील नमुद पोलीस अंमलदार यांना या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आस्था/पोना ते

पोहवा/पदोन्नती/4318/2020 वाशिम दिनांक 11/08/2020 अन्वये पोलीस नाईक ते पोलीस हवालदार या पदावर वेतन मॅट्रीक्स एस-9-26400-83600/- या वेतन श्रेणीमध्ये पदोन्नती दिल्याने नमुद पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास पोलीस हवालदार पदाची पदोन्नती रकाना क्र.7 नुसार स्विकारली आहे.नमुद पोलीस अंमलदार यांची वेतन निश्चिती म.ना.से.वेतन नियम 11(1)(ब) प्रमाणे कनिष्ठ पदावर एक वेतनवाढ देवुन त्यांची म.शा.वित्त विभाग अधिसुचना दिनांक 30 जानेवारी 2019 मधील नियम 10 अन्वये वेतन निश्चिती त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र | पोलीस अमलदार यांचे नाव पदनाम | नेमणुक | वेतन स्तर | पोना पदाचे मुळ वेतन पे मॅट्रीक्स मधील वेतन | पदोन्नती वेतन स्तर | पदोन्नती स्विकारल्याचे दिनांकापासुन मुळ वेतन पे मॅट्रीक्स मधील वेतन | पोहवा पदावर पदोन्नती देय/स्विकृती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | पोना/49,विनोद दामोधर सुर्वे | पो.मु. वाशिम | S-8 | 35300/- | S-8 | 35300/- | 01/07/2019 | |
| | | | S-8 | 35300/- | S-9 | 36500/- | दि.16/09/2019 पोहवा पदोन्नती वेतनस्तर (एस-9) | |
| | | | S-8 | 36400/- | S-9 | 37600/- | दि.01/07/2020 | |
| | | | S-8 | 37500/- | S-9 | 38700/- | दि.01/07/2021 | |
| | | | S-8 | 38600/- | S-9 | 39900/- | दि.01/07/2022 | |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आलि-2/पोहवा/वेतन निश्चिती/19990/2022 वाशिम दिनांक 02/12/2022 अन्वये पोहवा/679,नागोराव बन्सी राठोड नेमणुक पोस्टे.मंगरुळपीर यांनी या कार्यालयाकडुन करण्यात आलेली वेतननिश्चिती आदेशामधील त्यांचे वेतनामध्ये तफावत असल्याबाबत विंनती केल्याने सुधारीत दराने स्तंभ अ नुसार देण्यात आलेली वेतनवाढ स्तंभ ब नुसार सुधारित रित्याने सदरची वेतननिश्चीत या आदेशाव्दारे मंजुर करण्यात येत आहे.दि.01/01/2016 ते दि.01/07/2022 पावेतो.

या कार्यालयाचे आदेश क्र.पोअवा/आलि-2/अर्जित रजा रोखीकरण/से.नि.पो.अंमलदार/14010/2022 वाशिम दिनांक-02/12/2022 अन्वये खालील वाशिम जिल्हा पोलीस दलातील पोलीस अंमलदार हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास या आस्थापनेवरुन स्वे.सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांचे नाव या जिल्हयाचे आस्थापनेवर मा.नंतर कमी करण्यात येत आहे.तसेच त्यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे अतिंम अर्जित लेखा यामध्ये शिल्लक असलेल्या अर्जित रजेचे रोखीकरण करण्याची मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र | सेवानिवृत्त पोलीस अंमलदाराचे नाव,पदनाम नेमणुक ब.नं | तत्कालीन नेमणुक | सेनि.दि | अतिंम मुळ वेतन | अंतिम शिल्लक अर्जित रजा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सेनि/पोहवा/334,अनिरुध्द विष्णु भगत | मंगरुळपीर | 30/06/2022 | 49600/- | 300 दिवस |

**भाग-4:-**

**बक्षिस :- निरंक**

**भाग -5 :-**

**शिक्षा -निरंक**

**निलंबन :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/विचौ/पोहवा-840 जगन्नाथ घाटे/निलंबन/13981/2022 वाशिम दिनांक ज़ 01/12/2022 अन्वये पाहेवा/840 जगन्नाथ कोंडुजी घाटे,नेमणुक पोस्टे.मानोरा हे दिनांक 18/09/2022 पासुन कोणतेही पुर्वकल्पना न देता कर्तव्यावर अनधिकृतपणे गैरहजर आहत.तसेच त्यांच्याकडे तपासावर प्रलंबित असलेले गुन्हे विनाकारण प्रलंबित ठेवले.त्याचे या अशोभनीय वर्तनामुळे त्यांना या कसुरीमुळे प्रस्तावित चौकशीचे अधिन राहुन आपणास मुंबई पोलीस शिक्षा व अपीले -1956 च्या नियम 3 चे पोटनियम (1)मधील (अ-2) च्या तरतुदीनुसार सदरचा आदेश निर्गमित केल्याचे तारखेपासुन त्वरीत प्रभावाने निलंबीत करण्यात येत आहे.

**भाग -6 :-**

**प्रशिक्षण:-**

या कार्यालयाचे आदेश क्र.पोअवा/पशा-1/ई-लर्निंग/समन्वय/पो.अधि नामनिर्देश/13985/2022 वाशिम दि.02/12/2022 अन्वये महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिम येथे दिनांक 09/09/2015 पासुन इ-अकादमी स्थापना झाली आहे.इ-लर्निंग व्दारे सर्व पोलीस अधिकार अंमलदार यांना लॅपटॉप/संगणक यावर विविध उपयुक्त आणि ी पोलीस स्टेशनच्या दैनदिन कार्यपध्दती यांचे प्रशिक्षण घेता येते.पोलीस विगातील अधिकारी कर्मचा-याच्या कामाचे स्वरुप व गुन्हयांच्या तपासाचे दृष्टी कोनातुन मार्गर्शन प्राप्त होणे तसेच त्यांना प्रशिक्षणे देणे करीता व नमुद विषयावर अद्यावत प्रशिक्षण देण्यात दृष्टीने सर्व पोलीस अधिकारी अंमलदार यांचे 100 % रजिस्ट्रेशन होणे आवश्यक आहे.त्याअनुषंगाने वाशिम जिल्हा पोलीस घटक आस्थापनेवरील खालील पोलीस अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे.त्यांचा संपुर्ण तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | नोडल अधिकारी यांचे नाव | पदनाम | सध्याची नेमणुक | मो.क्र | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री.संदिप बापुराव नरसाळे | सहायक पोलीस निरीक्षक | पोस्टे.सायबर | 8779629766 | sandiponarsale@gmail.com |

**ईतर :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आस्था-2/कर्म/पेंशन-सेवापट/13884/2022 वाशिम दिनांक - 28/11/2022 अन्वये खालील नमुद अंमलदार हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास मयत झालेले आहेत. त्यांचे मुळ सेवापटामध्ये लेखा अधिकारी वेतन पडताळणी पथक अमरावती यांचेकडुन 7 व्या वेतन आयोगानुसार वेतन पडताळणी होवुन त्यांचे सेवापट या कार्यालयास प्राप्त झाल्याने त्यांचे सेवापटामध्ये अद्यावत नोंदी घेवुन पेंशन प्रकरण तयार करण्याकामी सदरचे मुळ सेवापट पेंशन लिपीक पोलीस अधिक्षक कार्यालय,वाशिम यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र. | सेवानिवृत्त अंमलदाराचे नाव/पदनाम व ब.नं. | तत्कालीन नेमणुकीचे ठिकाण | मयत/दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | सेनि.सपोउपनि/334,अनिरुध्द विष्णुजी भगत | पोस्टे.मंगरुळपीर | दि.30/06/2022 |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक:पोअवा/आशा-4/श्वान-पथक /वैधकीय खर्च देयक/2022/मंजुर/2022/13972/वाशिम दि.:-01/12/2022 अन्वये श्वान पथक,.वाशिम येथील श्वान बेला चे माहे ऑगष्ट व सप्टेबंर 2022 मध्ये मुलभुत प्रशिक्षणा करीता श्वान बेलाचे वैधकीय खर्चावर करण्यात आलेले एकुण रक्कम रु.3039/- (अक्षरी तीन हजार एकोणचाळीस रुपये फक्त ) खर्चाचे बिलाचे पत्र या कार्यालयात प्राप्त झाले आहे. सदरील वैधकीय खर्चाचे देयकाचा खर्च सन 2022 - 2023 चे वित्तीय वर्षामध्ये " इतर खर्च " या उपलेखाशिर्षाखली मंजुर करण्यात येत आहे.

( बच्चन सिंह )

**भा.पो.से.**

पोलीस अधिक्षक वाशिम.

प्रति,

संगणक कक्ष प्रमुख/पत्रव्यवहार शाखा लिपीक -1/ डिपीजी लिपीक पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक कार्यावाहीस रवाना.

2/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक 48 हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वांकरीता उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाख प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संकेतस्थळावर "ई-मेल व्दारे सर्व संबंधितांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.